ePaper


‘समृद्धी’चा शेवटचा टप्पा डिसेंबरअखेर पूर्ण : मुख्यमंत्री

वर्ष - 7 । अंक -30 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शनिवार, दि. 27 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**


- पुण्यात भाजपने भाकरी फिरवली!
- पुण्यात 'एक दिवस डोक्यासाठी' सुरु
- प्रशासकीय राजवटीत देखील ठेकेदारांसाठी पायघड्या!


# महापालिकेला ‘सीबीएसई’चे वावडे?

## शाळांमध्ये अभ्यासक्रम नाही : विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळेना

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये ई – लर्निंगवर भर देऊन विद्यार्थ्यांना डीजिटल शिक्षण देण्यात येत आहे. काही शाळा सेमी इंग्लिश देखील आहेत. मात्र, खासगी शाळांप्रमाणे सुविधा देवूनही सीबीएसई बोर्डचा अभ्यासक्रम नसल्याने शाळांना प्रतिसाद कमी आहे.**



महापालिकेने याच शाळांमध्ये सीबीएसई बोर्ड अभ्यासक्रम सुरू केल्यास सध्या खासगी शाळा देत असलेले महागडे शिक्षण आणि भरमसाठ फी यांना आळा बसू शकेल आणि सर्वसामान्य व गोरगरीब मुलांना देखील दर्जेदार शिक्षण मिळू शकेल. मात्र, पालकांकडून अव्वाच्यासवा शुल्क सीबीएसई शाळा वसूल करत आहे. त्यामुळे सीबीएसई शाळेच्या नावाखाली पालकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट होत आहे. अशा परिस्थितीत पालिकेतील शाळांत सीबीएसई अभ्यासक्रम सुरु केल्यास पालकांचा खासगी शाळांकडील ओढा कमी होईल. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ हे राज्यात शालेय शिक्षण व्यवस्था पाहणारा शासनाचा विभाग आहे. अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे ठरवत असते. तो अभ्यासक्रम फक्त राज्यापुरता मर्यादित असतो. तर सीबीएससीचा अभ्यासक्रम हा पूर्ण भारतामध्ये सारखाच असतो. त्यामुळे नोकरदार व कामानिमित्त देशातील इतर राज्यांत जाणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी हा अभ्यासक्रम सोयीस्कर ठरतो. सध्या अनेक पालकांचा पाल्यांना सीबीएसई अभ्यासक्रमातून शिकवण्याचा कल वाढत आहे.

### कांक्षा फाऊंडेशनच्या शाळांना प्रतिसाद...

» महापालिकेच्या वतीने शहरात ११० प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा चालवल्या जातात. त्यात मराठी माध्यमाबरोबर हिंदी, इंग्रजी माध्यमांच्या शाळाही आहेत. मात्र या महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा आहेत. त्यामध्ये सुमारे ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके, गणवेश, बुट, दप्तर, सर्व काही अगदी मोफत दिले जाते. शिवाय माध्यान्ह भोजनही मिळते. शाळांच्या इमारतीही आकर्षक आहेत. या शाळांचा दहावीचा निकालही उत्तम असतो. त्यामुळे पालिका शाळांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेने पालिकेच्या पाच इंग्रजी माध्यमांच्या शाळा आकांक्षा फाऊंडेशनला चालविण्यास दिल्या आहेत. या शाळांमध्ये सध्या प्रवेशासाठी रांगा लागलेल्या पहायला मिळतात.

“ टाळगाव चिखली येथे पालिकेची एक सीबीएसई बोर्डाची शाळा आहे. पालिकेच्या शाळांमध्येदेखील सीबीएसई बोर्ड अभ्यासक्रम प्रायोगिक तत्त्वावर काम सुरू करण्याचा विचार सुरू आहे. त्यासाठी खूप तयारी करावी लागेल. त्या शाळांचे निकष वेगळे असतात. कोणत्या शाळांत सीबीएसई बोर्ड अभ्यासक्रम सुरू करावा, यावर चर्चा करण्यात येणार आहे.

– **संजय नाईकडे,** प्रशासन अधिकारी.

# रयतेचे कल्याणकारी राज्य हवे; तर सहभागी व्हा!

## मयूर दौंडकर यांचे आवाहन : दि. 28 मेपासून ‘आप’ ची स्वराज्य यात्रा

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्यातील रयतेचे कल्याणकारी राज्य हवे असेल, तर आम आदमी पार्टीच्या वतीने सुरू होणाऱ्या “स्वराज्य यात्रेत” सहभागी व्हा. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि सत्तेतील वतनदारांना घरी बसवण्यासाठी या यात्रेचे साक्षीदार व्हा, असे आवाहन आपचे नेते मयूर दौंडकर यांनी केले आहे.**

आम आदमी पार्टीतर्फे दि. २८ मे पासून श्रीक्षेत्र पंढरपूर ते रायगड अशी “स्वराज्य यात्रा” काढण्यात येणार आहे. आम आदमी पार्टीचा विचार जनसामान्यापर्यंत पोहचवणे, लोकांना भेडसावणाऱ्या समस्यांना वाचा फोडणे, सत्तेतील वतन दारांना हटवून सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या सर्वसामान्यांचे राज्य आणण्याचे उद्दीष्टाने ही यात्रा काढण्यात येणार आहे.




यात्रेचा मार्ग सोलापूर-इंदापूर-भिगवण-बारामती-फलटण-कोल्हापूर-सांगली-सातारा-पुणे- पिंपरी चिंचवड-पनवेल-अलिबाग-रायगड असा असून, दहा दिवसांचा प्रवास पंढरपूर येथून सुरू होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आशीर्वाद घेऊन दि. ६ जून रोजी रायगड येथे यात्रेची सांगता होणार आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह...

» राज्यात आगामी निवडणुकांच्या दृष्टीने “स्वराज्य यात्रा” निर्णायक ठरणार आहे. आपचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी राज्यातील भाजपाविरोधी पक्षांच्या प्रमुखांशी चर्चा केली आहे. देशपातळीवर आप भाजपाला पर्याय म्हणून आप समोर येत आहे. त्यामुळे आपच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

“ ‘भक्ती-शक्तीचा संगम’ म्हणून ही यात्रा महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठमाऊलीचा आशीर्वाद घेवून श्रीक्षेत्र पंढरपूर येथून मार्गक्रमण करत आहे. शिवराज्याभिषेक दिनी दि. 6 जून रोजी रायगड किल्ल्यावर छत्रपतींचा आशीर्वाद घेवून समाप्त होईल. सर्वांनी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, छत्रपतींच्या स्वप्नातील रयतेचे कल्याणकारी राज्य घडविण्यासाठी, स्वराज्य यात्रेमध्ये मोठ्या संख्येने सामील व्हावे. महाराष्ट्रात बदल घडवावा.

– **मयूर दौंडकर,** नेते, आम आदमी पार्टी.

# शहरातील वाहतूक कोंडी होणार दूर!

## पुणेकरांसाठी गुड न्यूज: चांदणी चौक उड्डाणपुलाच्या उद्घाटनासाठी मुहूर्त ठरला!

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चांदणी चौकातील वाहतूक कोंडी कायमची दूर करण्यासाठी बांधल्या जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या उद्घाटनासाठी आता १५ जुलैचा नवा मुहूर्त ठरला आहे. सर्व कामे १५ जुलैपूर्वी पूर्ण करा, अशा स्पष्ट शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या चौकातील एका सेवा रस्त्यावरून गुरुवारी वाहतूक सुरू करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**



चांदणी चौकातील वाहतूक कोंडीचा फटका सामान्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही बसला. त्यानंतर या प्रकल्पाच्या कामाची सूत्रे हलली. त्यापूर्वी २०१७मध्ये गडकरी यांच्या हस्ते प्रकल्पाचे भूमिपूजनही झाले होते. या उड्डाणपुलाचे उद्घाटन एक मे रोजी करण्याचे यापूर्वी गडकरी यांनी जाहीर केले होते; पण या मुदतीत सर्व कामे पूर्ण करण्यात 'एनएचएआय'ला अपयश आले.

त्यामुळे गडकरी गुरुवारी पुण्यात आले असताना, त्यांनी 'एनएचएआय'च्या अधिकाऱ्यांकडून या संपूर्ण प्रकल्पाचा पुन्हा आढावा घेतला. 'एनएचएआय'चे प्रकल्प संचालक संजय कदम आणि इतर वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

या प्रकल्पाचा भाग असलेल्या ला कासा सोसायटीजवळील सेवा रस्त्यावरून वाहतूक गुरुवारी सुरू करण्यात आली. त्यामुळे मुंबईकडून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांना साताऱ्याला जाता येणे शक्य झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

### 'गर्डरसाठी थांबणार नाही'

**» या बैठकीबाबत कदम म्हणाले, 'चांदणी चौकातील मार्गाचे काम ९३ टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरीत सात टक्क्यांमध्ये उड्डाणपुलाच्या कामाचा समावेश आहे. पुलाच्या दोन्ही बाजूकडील गर्डर टाकण्याचे काम सुरू आहे. येत्या एक जून रोजी मध्यभागातील गर्डर टाकण्याचे काम सुरू होणार आहे. सेवा रस्त्यांचे काम पूर्ण झाल्याने मध्यभागी टाकण्यात येणाऱ्या गर्डरसाठी वाहतूक थांबवण्याची गरज नाही. ही वाहतूक सेवा रस्त्यांवरून सुरू राहील. त्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही. रंगरंगोटीची कामेही शिल्लक आहेत. ही कामे लवकरात लवकर पूर्ण करून त्याचे येत्या १५ जुलैला उद्घाटन करण्याचे आदेश वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहेत.'**

---

## पुण्यातील रिक्षाचालकाचा अनोखा झोल; ई-चलनामुळे वाहतूक पोलिसांनी आवळल्या मुसक्या

| पुणे | महाईन्यूज |

एकाच क्रमांकाच्या दोन गाड्या रस्त्यावर फिरत असल्याचा प्रकार वाहतूक पोलिसांनी पाठविलेल्या ई-चलनाच्या माध्यमातून समोर आला आहे. बनावट क्रमांक वापरत असलेल्या गाडीला बजावलेला दंड, मूळ वाहनधारकाला पाठविण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

श्रीकांत मोहन वेळेकर (वय ३६, रा. महात्मा गांधी वसाहत, शिवाजीनगर ) याला अटक केली आहे. या प्रकरणी राजेंद्र चंद्रकांत बोराटे (वय ५०, रा. निरा) यांनी खडकी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदार हे नीरा परिसरात रिक्षा व्यवसाय करतात. त्यांची रिक्षा नीरा येथे असताना त्यांना पुण्यात रिक्षाला दंड बजावल्याचे चलन प्राप्त झाले. त्यांनी एका रिक्षा चालक संघटनेच्या पदाधिकाऱ्याशी संपर्क साधला. त्यांनी खडकी वाहतूक विभागाला हे कळविले.



### प्रकार काय ?

बनावट क्रमांक धारण केलेली रिक्षा २१ मे रोजी सकाळी अकरा वाजता खडकीतील पोल्ट्री चौकात आली असता, पोलिसांनी रिक्षा थांबवली. चालक वेळेकर याच्याकडे लायसन्स नव्हते. त्याने गणवेशही परिधान केला नव्हता. तो रिक्षा चालवत होता, म्हणून वाहतूक पोलिसांनी त्याच्या रिक्षाच्या नोंदणी क्रमांकावरून एक हजार रुपयाचे ई-चलन पाठवले. त्याचा मेसेज तक्रारदार बोराटे यांना गेला. तो मेसेज पाहून ते आश्चर्यचकीत झाले. त्यांनी खडकी पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी श्रीकांत वेळेकर याचा शोध घेऊन त्याला अटक केली. उपनिरीक्षक वैभव मगदूम तपास करीत आहेत.

---

## राष्ट्रवादीच्या २३ वर्षांच्या सत्तेला सुरुंग

### » दौंडमध्ये भाजपचा झेंडा, राहुल कुल यांची सरशी

| पुणे | महाईन्यूज

**दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीवर संस्था स्थापनेच्या इतिहासापासून पहिल्यांदाच भाजपने झेंडा फडकवला आहे. त्यामुळे दौंडचे आमदार राहुल कुल यांचे वजन वाढले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अध्यक्षपदी भाजपचे गणेश जगदाळे आणि उपाध्यक्षपदी शरद कोळपे विजयी झाले आहेत. त्यामुळे गेल्या २३ वर्षांपासून राष्ट्रवादीचे नेते रमेश थोरात यांच्या प्रतिष्ठेला सुरुंग लागला आहे.**



बारामती लोकसभा मतदारसंघात भाजपने लक्ष घालण्यास सुरुवात केल्यापासून भाजपची घोडदौड पाहायला मिळत आहे. जेव्हापासून समितीची स्थापना झाली तेव्हापासून भाजपला आपला झेंडा रोवता आला नव्हता. मात्र आता अध्यक्ष आणि उपाध्यक्षही भाजपचे झाले आहेत. त्यामुळे दौंड तालुक्यात राहुल कुल यांचे वजन वाढत असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये १८ संचालकांमधून राष्ट्रवादी व भाजपाचे प्रत्येकी ९-९ सदस्य निवडून आले होते. मात्र एका आठवड्यापूर्वी राष्ट्रवादीचे नवनिर्वाचित संचालक संपत निंबाळकर यांचे निधन झाल्याने राष्ट्रवादीची १ जागा कमी झाली होती. त्यामुळे आज पुन्हा निवडणूक घेण्यात आली.

### पहिल्यांदाच दौंड बाजार समितीमध्ये शिरकाव

**» या विजयामुळे भाजपने इतिहासात पहिल्यांदा आपली सत्ता दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीवर मिळवली आहे. यावेळी आमदार राहुल कुल यांनी स्वतः उपस्थित राहून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. गेल्या २३ वर्षांच्या इतिहासामध्ये आमदार कुल यांनी पहिल्यांदाच दौंड बाजार समितीमध्ये शिरकाव केला आहे.**

यात भाजपाचे गणेश जगदाळे यांच्या विरोधात राष्ट्रवादीचे बाळासाहेब शिंदे तर शरद कोळपे यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या वर्षा मोरे यांच्यामध्ये यांनी अर्ज दाखल केले होते. मात्र यामध्ये भाजपाचे गणेश जगदाळे आणि शरद कोळपे यांना प्रत्येकी ९ मते पडली तर राष्ट्रवादीच्या उमेदवारांना प्रत्येकी आठ मते पडली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी हर्षित तावरे यांनी जगदाळे व शरद कोळपे यांना विजयी घोषित केले.

# शहरात मराठा वनवास यात्रा दाखल!

## ओबीसी कोट्यातून आरक्षणाची मागणी : यात्रा मंत्रालयावर धडकणार

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**तुळजापूर ते मंत्रालय मुंबई असा 500 किलोमीटर प्रवास करत ही यात्रा 06 जून रोजी मंत्रालयावर धडकणार आहे. महाराष्ट्रात वातावरण चिघळण्याची शक्यता आहे. 42% च्या ही पुढे तापमान गेले. अक्षरशः सूर्य आग ओकत आहे. अश्याही स्थितीत सव्वा तीनशे किलोमीटरचा टप्पा पूर्ण करत मराठा समाजाची वनवास यात्रा पिंपरी-चिंचवड शहरात पोचली आहे.**



मराठा समाजाला 50% च्या आत ओबीसी मधूनच आरक्षण मिळाले पाहिजे. यासाठी तुळजापूर पासून मुंबईपर्यंत पायी चालत जाणारे हे आगळे वेगळे आंदोलन सध्या महाराष्ट्रात सुरू आहे.

गोणपाटाचे वस्त्र परिधान करून, मराठा बांधव वाटचाल करत आहेत. प्रभू श्रीरामचंद्र यांना 14 वर्षेच वनवास भोगावा लागला. परंतु मराठा समाजाला गेली अनेक दशके आरक्षणाच्या बाबत वनवास भोगावा लागत आहे. तो आरक्षणाचा सुरू असलेला वनवास मिटावा यासाठी ही मराठा वनवास यात्रा असल्याचे आयोजक श्री योगेश केदार यांनी सांगितले.

यावेळी मराठा सेवा संघ उद्योग कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश जाधव, संभाजी ब्रिगेड चे पिंपरीचिंचवड शहर अध्यक्ष सतीश काळे, ज्येष्ठ नागरिक कक्षाचे मोहन जगताप, मराठा सेवा संघाचे सुभाष देसाई, चंद्रकांत शिंदे, रमेश जाधव, संपत फरतडे जिजाऊ ब्रिगेडच्या सुलभाताई यादव यांनी स्वागत केले.तसेच जिजाऊंच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. इथून पुढे ही यात्रा तळेगाव दाभाडे मार्गे जुन्या घाटातून खोपोली मार्गे मुंबई मध्ये जाणार आहे. मराठा समाजाला ओबीसी मधूनच आरक्षण लागू होई पर्यंत मुंबई सोडणार नाही, अशी ठाम भूमिका या मराठा वनवास यात्रेची आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात वातावरण चिघळण्याची शक्यता आहे.

### संभाजी ब्रिगेडकडून यात्रेचे स्वागत...

» तुळजापूर ते मुंबई च्या वाटेत लागणाऱ्या प्रत्येक शहरात आणि गावोगावी सभा बैठका घेत आरक्षण म्हणजे नेमके काय? संविधानात तरतुदी काय आहेत? राज्य कर्त्यांनी नेमकी फसवणूक कशी केली? यापुढे मराठा समाजाची नेमकी भूमिका काय असावी? याबाबत जनजागृती केली जात आहे.अशी माहिती प्रताप सिंह कांचन, सुनील नागणे व सहकाऱ्यांनी दिली. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड शहरात आज मराठा सेवा संघ तसेच संभाजी ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले.

# ‘जलपर्णीमुक्त इंद्रायणी’साठी महानगरपालिका प्रशासन ‘अलर्ट’

## पाहणी दौरा : प्रशासकीय यंत्रणांची पूर्वतयारी

**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कचरा संकलनाच्या नावाखाली शहरातील जनतेवर लावलेला उपयोगकर्ता शुल्क रद्द करणेबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे वतीने महापालिका उपआयुक्त जितेंद्र वाघ यांना निवेदन देण्यात आले.**



### काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना...

» पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आषाढीवारी पूर्व तयारी बैठकीत डी. डी. भोसले पाटील यांनी इंद्रायणी पात्रातील जलपर्णी काढण्याच्या सुरू असलेल्या कामास आणखी गती देणेबाबत सूचना मांडली होती. या अनुषंगाने प्रशासनाने तत्काळ या प्रश्नाची दखल घेवून या संयुक्त पाहणी द्वारे आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना व यंत्रणांना हे काम लवकरात लवकर पूर्ण करून घेण्याचे निर्देश दिले आहेत.

संत ज्ञानेश्वर माऊली आषाढी पालखी सोहळा जवळ आला असून राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी पूर्वतयारी सुरू केली आहे.

याचाच एक भाग म्हणून दि.26 रोजी आज आळंदी घाटा नजीकच्या जलपर्णी काढण्याच्या कामकाजाची आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी संयुक्त पाहणी करून सदर काम गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. आळंदी हद्दीतील इंद्रायणी पात्रातील जलपर्णी काढण्याच्या कामास नगरपरिषदेच्या विनंती वरून पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत मागील 4 दिवसांपासून सुरुवात झाली आहे. सदर कामाची प्रगती पाहून आवश्यक त्या सूचना देण्याकरिता या दोन प्रमुख अधिकाऱ्यांनी हा संयुक्त पाहणी दौरा केला. या पाहणीवेळी आळंदी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक किशोर तरकासे, बांधकाम अभियंता संजय गिरमे, मिथील पाटील, बोत्रे, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते.

# बालचमूंची पावले पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क, तारांगणाकडे...

## दिवसाला पाचशेहून अधिक नागरिकांची प्रकल्पांना भेट

**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शाळांना उन्हाळी सुटी असल्याने बालचमूंची पावले पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि नव्याने सुरू झालेल्या तारांगणकडे वळू लागली आहेत. दिवसाला पाचशेहून अधिक नागरिक या प्रकल्पांना भेटी देत आहेत.**




### तारांगणमध्ये दररोज सहा खेळ

» तारांगणमध्ये दररोज सहा खेळ होत आहेत. पहिला खेळ सकाळी ११ वाजता सुरू होतो. मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांमधून हे खेळ दाखविले जातात. सध्या उन्हाळी सुटी असल्याने महाराष्ट्रातील विविध भागांतील मुले तारांगण व सायन्स पार्क पाहण्यासाठी येत आहेत. त्यामुळे दोन ते १२ वर्षांपर्यंत मुलांसाठी तारांगण व सायन्स पार्क पाहण्यासाठी ८० रुपये, २० जणांच्या १२ वर्षांपुढील मुलांसाठी १४० रुपये, इतर नागरिकांसाठी सायन्स पार्कला ६०, मुलांसाठी ३०, तर तारांगणसाठी १०० आणि मुलांसाठी ८० रुपये तिकीट दर आहे.

महापालिकेने सात एकर क्षेत्रफळावर सायन्स पार्कचा विस्तार केला आहे. विज्ञानातील अनेक शोध, संदर्भ इमारतीमधील एकूण चार दालनांमध्ये प्रदर्शन स्वरूपात आहेत. खुल्या उद्यानामध्ये विज्ञानाची तत्त्वे उलगडणारी खेळणी ठेवली आहेत. इमारतीमध्ये वाहनांची संपूर्ण माहिती देणारे ऑटोमोबाइल दालन, वातावरणीय बदलांची माहिती देणारे हवामान परिवर्तन दालन, मनोरंजक विज्ञान, ऊर्जा दालनासह ‘उडी सायन्स शो’ व तारामंडल शो सुविधा उपलब्ध आहेत. विज्ञानातील अनेक मूलभूत शोध त्यांच्या माहितीसह प्रतिकृती स्वरूपात पहावयास मिळतात.डायनो पार्क, विज्ञान उद्यान लहान मुलांचे आकर्षण केंद्र आहे. ऑटोमोबाइल दालन, ऊर्जा दालन, हवामान परिवर्तन दालन हे नव्याने सुरू झालेले आहे. या उद्यानातील भारतीय वैज्ञानिकांचे बसवण्यात आलेले अर्धाकृती पुतळे पाहून व त्यांच्या विषयीची माहिती वाचून लहान मुलांना प्रोत्साहन मिळते. याशिवाय आकाश दर्शन, विविध विज्ञान व्याख्याने, विज्ञान प्रात्यक्षिक कट्टा, उन्हाळी सुटीतील विज्ञान शिबिरे असे उपक्रम सातत्यपूर्वक या ठिकाणी सुरू आहेत. उन्हाळी सुटीच्या पार्श्वभूमीवर सायन्स पार्क, तारांगणमध्ये शनिवार व रविवारी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने सायंकाळी साडेसहापर्यंत वेळ वाढविण्यात आली आहे.

# लोकशाहीचे नवे मंदिर!



भारताचे सध्याचे संसद भवन १९२७मध्ये बांधून पुरे झाले. त्याचे काम १९२१मध्ये सर एडविन लचिन्स आणि हर्बर्ट बेकर या वास्तुरचनाकारांनी सुरू केले. ही नितांत देखणी वर्तुळाकार इमारत तीन दशकांपूर्वीच अपुरी, नव्या तंत्रवैज्ञानिक सुविधा देण्यास कमी पडू लागली. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, संसद भवनावर दहशतवाद्यांनी हल्ला केला; त्यामुळे हे संसद भवन पुरेसे सुरक्षित आहे का, असाही प्रश्न पडला. जवळपास प्रत्येक अधिवेशनात संसद सदस्य इमारतीतील उणिवांबद्दल काही ना काही तक्रारी करीत असत. यावर उपाय म्हणून, २०१०च्या सुमारास नव्या इमारतीची चर्चा सुरू झाली. लोकसभेच्या तेव्हाच्या अध्यक्ष मीराकुमार यांनी २०१२मध्ये या विषयाच्या सर्व बाजू तपासून पाहण्यासाठी समितीच नेमली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीला, २८ मे रोजी उद्घाटन होत असलेले नवे संसद भवन साकारण्यामागे असा इतिहास आहे.

देशाला नवे संसद भवन हवे, याबाबत कुणालाही कधी शंका नव्हती. मग ते बांधले जात असताना राजकीय पक्षांमध्ये मतैक्य नसावे आणि त्याचे उद्घाटन होताना अनेक पक्षांनी त्या कार्यक्रमावर बहिष्कार घालावा, हे नवल आहे. या विरोधाचे सर्वांत ताजे कारण, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते याचे उद्घाटन का होत नाही, असे सांगितले जाते. ते सबळ आणि तार्किक आहे. राष्ट्रपती हेच देशातील सर्वोच्च घटनात्मक पद आहे; तेव्हा त्यांनी या ऐतिहासिक क्षणी उद्घाटन समारंभाचे नेतृत्व केले असते, तर ते योग्य ठरले असते. मात्र, यापूर्वी दोन वेळा संसदेच्या संकुलात नव्या इमारतींची भर पडली, तेव्हा राष्ट्रपती उद्घाटनाला आले नव्हते, हे काहींनी शोधून काढले. ऐतिहासिक परंपरा असणारा राजदंड म्हणजे 'सेंगोल', नेहरूपर्वात पहिल्यांदा संसदेत दिला-घेतला गेला; तेव्हाही तेथे राष्ट्रपती होते का, हा प्रश्नच आहे. राष्ट्रपतींना का बोलावले नाही, असे आज विचारणारे अनेक विरोधक आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी या आधी संसदेच्या बांधकामालाच विरोध करीत होते. तो विरोध आता संपला का? 'सेंट्रल व्हिस्टा' या नव्या संसद भवनाचा समावेश असणाऱ्या प्रकल्पाच्या विरोधातली याचिका आधी उच्च न्यायालयाने आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली; तरीही विरोधक या प्रकल्पावर टीका करीत राहिले. संसद भवनाचे उद्घाटन आता दोन दिवसांवर आले असताना, गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात नवी याचिका दाखल झाली आहे. 'नव्या संसद भवनाचे उद्घाटन करा' अशी सूचना राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालयाने द्यावी, अशी मागणी तीत आहे. न्यायालय काय ते ठरवीलच; पण प्रत्येक गोष्टीचे राजकारण करण्याचे कसे टोक गाठले जाते, याचे ही याचिका हे उदाहरण आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी या संसद भवनाचे उद्घाटन करणार आणि या 'इव्हेंट'चा पुढे थेट किंवा आवृत्त प्रचारात भरपूर उपयोग केला जाणार, हे सांगायला ज्योतिषी कशाला हवा? राष्ट्रपतींनी या कार्यक्रमास हजेरी लावली असती, तर असा उघड प्रचार करणे थोडे अवघडही झाले असते. मात्र, मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर वेळ न दवडता विक्रमी वेळेत हे अत्याधुनिक सोयींचे, वाढीव क्षमतेचे आणि भूकंपरोधी संसद भवन बांधून घेतले, हे विसरून चालणार नाही. अशी वेगवान कार्यसंस्कृती भारतीयांना परिचयाची आणि सोयीचीही नाही. करोनाचा कहर असताना सरकार या कामावर उधळपट्टी करीत आहे, अशी टीका झाली. संसदेच्या बांधकामाला बाराशे कोटी लागतील, असा अंदाज होता. तो ९६२ कोटी आला आहे. मात्र, केंद्र सरकार राजधानीत दर वर्षी खासगी इमारतींमधील सरकारी कार्यालयांसाठी एक हजार कोटी रुपये भाड्यापोटी भरते. ही उधळपट्टी इतक्या वर्षांत का थांबवली गेली नाही?

भारतासारखा विशाल देश मार्गक्रमण करतो, तेव्हा त्या प्रदीर्घ वाटचालीत यशाच्या तेजस्वी खुणा निर्माण करून कालपटावर पेरून ठेवाव्या लागतात. सम्राट अशोकापासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत आणि पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू; तसेच सरदार पटेल यांच्यापासून इंदिरा गांधी यांच्यापर्यंत सर्वांना ही दृष्टी होती. पंडितजींनी महाकाय धरणांना 'आधुनिक भारताची मंदिरे' म्हटले, त्यामागे हीच दृष्टी होती. साऱ्या जगात आणि आसपास लोकशाहीची प्रचंड पडझड होत असताना, भारताने सात दशके संसदीय लोकशाहीची तेजस्वी दीपमाळ तेवती ठेवली आहे. हे यश छोटे नाही. शेवटच्या माणसाच्या अभ्युदयाची लोकशाही हीच चिरंतन आणि विश्वासार्ह आशा असते. अभिमान वाटावा अशा या भारतीय लोकशाहीचे नवे मंदिर, म्हणजे नवे संसद भवन असा व्यापक विचार विरोधकांनी करून, यात पक्षीय राजकारण आणायलाच नको होते. आपल्या निदान राजकीय स्वार्थासाठी तरी सारे श्रेयमैदान एका व्यक्तीसाठी मोकळे न सोडता तिथला अवकाश व्यापावा, इतकेही भान विरोधकांना राहिलेले नाही. या उद्घाटन समारंभावरील बहिष्कार विरोधकांची नैतिक उंची किंवा इभ्रत वाढविणारा नाही.

## संपादकीय »

### 'सल्लाबाजार' कितपत फायद्याचा?

***आज जगभरात जवळ-जवळ प्रत्येक क्षेत्रात पडद्यामागे राहून आपल्या जीवनावर मोठा परिणाम करणाऱ्या बडय़ा सल्लागार कंपन्या, अर्थात 'कन्सल्टेशन कंपन्या' महत्त्वाची भूमिका बजावत आहेत..***

'मॅकिन्सी', 'बेन', 'केपीएमजी', 'बॉस्टन कन्सिल्टग ग्रुप', 'डेलॉईट' यांसारख्या अनेक सल्लागार कंपन्या आता उदयास आल्या आहेत. समस्या निवारण करणाऱ्या वा स्वत:ला समस्या निवारक म्हणवून घेणाऱ्या या कंपन्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा उलगडा नेमका कशा प्रकारे करतात, असा प्रश्न विचारल्यास उत्तर काहीसे मोघम असू शकते. विविध उद्योगांमध्ये उद्भवणाऱ्या समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी अशा अनेक कंपन्या अस्तित्वात आल्या. 'एक्सऑन मोबील', 'वॉलमार्ट', 'जनरल मोटर्स', 'फायजर' अशा बडय़ा कंपन्यांपासून ते जागतिक आरोग्य संघटना, अमेरिकेतील राज्य शासनाचे अनेक विभाग, तसेच फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड आणि भारतातीलही अनेक सरकारी विभागांमध्येही या सल्लागार कंपन्यांचे जाळे पसरले आहे. या सल्लागार कंपन्या काही विशिष्ट क्षेत्रांत काम करताना दिसतात.

**दिल्लीच्या इशिता किशोरसह चौघींनी यंदाच्या वर्षी भारतीय प्रशासकीय सेवेसाठीच्या परीक्षेतील पहिले चार क्रमांक सहज पटकावले आहेत. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या एकूण ९३३ जणांमध्ये ३२० मुली आहेत आणि त्यांच्यातही चौघींना पहिले चारही क्रमांक.**

## 'सावित्री'च्या वाटेवरून...

एवढेच नाही तर पहिल्या दहांमध्ये मुलींची संख्या सहा आणि पहिल्या २० मध्ये मुलींची संख्या ११ म्हणजे ५० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. या आणि बाकीच्या ३०० मुलींचे कौतुक तर करायलाच हवे. कारण जगण्याची स्पर्धा ज्याच्यासाठी अधिक खडतर असते, ती प्रजाती टिकून राहण्याच्या बाबतीत अधिक चिवट, असे एक नैसर्गिक तत्त्व आहे. आपल्याकडच्या दहावी-बारावीसारख्या परीक्षा असोत की अगदी भारतीय प्रशासकीय सेवेसारख्या, गेल्या २५-३० वर्षांमध्ये त्यात मुली ज्या पद्धतीने यश मिळवताना दिसतात, ते पाहता हे तत्त्व सिद्ध होते, असे म्हणता येईल. खरे तर हजारो वर्षे परंपरेने नाकारल्या गेलेल्या अनेक गोष्टी आणि त्या मिळवून देणारी गेली १००-१५० वर्षे हा काळाच्या पटावरचा मोठा विरोधाभासच खरा, पण आपल्या देशातल्या लेकी ही उडी सगळय़ाच क्षेत्रांत लीलया घेत आहेत.

आता मुद्दा प्रशासकीय सेवेचा. गेली काही वर्षे या सेवांमध्ये येऊ इच्छिणाऱ्या, त्यासाठीची परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत असल्याचे आकडेवारी सांगते. २००१ मध्ये ४७,३९२ मुलींनी ही परीक्षा दिली होती. तर २०१९ मध्ये तीन लाख ६७ हजार ८५ मुलींनी ही परीक्षा दिली. पण या आकडेवारीच्या तुलनेत ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण मात्र कमी आहे. प्रचंड अभ्यास, त्यासाठी प्रचंड वेळ आणि



मेहनतीची मागणी करणाऱ्या या परीक्षेसाठी मुलग्यांच्या तुलनेत मुलींना घरातून मिळायला हवा तेवढा पाठिंबा मिळतोच असे नाही. काहीही झाले तरी उद्या सासरी जाऊन तिला संसारच करायचा आहे, त्यामुळे कमी जबाबदारीची, भरपूर सुट्टय़ा असणारी नोकरी तिने करावी, पटकन अर्थार्जनाला लागावे आणि लग्न करावे ही तिच्याबद्दलची अपेक्षा आजही तिला अधिकारपदाची, मोठय़ा जबाबदारीची स्वप्ने बघू देत नाही, हे वास्तव आहे. म्हणूनच हा अवकाश उपलब्ध करून देणाऱ्या या मुलींचे पालकही दखल घ्यावे असेच.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिर्डीचा प्रवास वेगवान होणार!

## समृद्धी महामार्गाचा दुसरा टप्पा आजपासून सुरु, 82 किमीचा मार्ग

### दुसऱ्या टप्प्यात 82 किमी मार्गात तीन टोल नाक्यांचा समावेश

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याची राजधानी व उपराजधानी यांना जलदमार्गे जोडणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे आज, शुक्रवारी २६ मे रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. दुसऱ्या टप्प्यात ८२ किमी मार्गाचा समावेश असेल. मात्र, या ८२ किलोमीटरमध्ये तीन टोल नाक्यांचा समावेश आहे.**



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) बांधत असलेल्या एकूण ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गाचा ५२० किमीचा पहिला टप्पा नागपूरजवळील शिवमडका ते शिर्डीजवळील कोकणठामपर्यंत डिसेंबरमध्येच सुरू झाला. त्यानंतर आता दुसरा टप्पा कोकणठामपासून ११ किमी अंतरावरील चंदेकासरे या गावातील शिर्डीसाठीच्या आंतर बदलापासून सुरू होत आहे. तिथपासून इगतपुरी तालुक्यातील भरवीर खुर्दपर्यंत हा ८२ किलोमीटर लांबीचा मार्ग आहे.

या दुसऱ्या टप्यात सिन्नर येथील गोंदे इंटरचेंज येथून नाशिक, अहमदनगर, पुणे व त्या भागातील इतर गावांसाठी या महामार्गाचा उपयोग होणार आहे. भरवीर आंतरबदलापासून घोटी (ता. इगतपुरी) हे जवळपास १७ किमी अंतरावर आहे. यापासूनच नाशिक, ठाणे, मुंबई येथून शिर्डीला जाणाऱ्या भाविकांचा प्रवास जलद होणार आहे. या टप्यात अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील एकूण ७ गावातील ११.१४१ किमी मार्गाचा समावेश आहे. तर नाशिक जिल्ह्यातील ६८.०३६ किमी मार्गाचा समावेश आहे. त्यामध्ये सिन्नर तालुक्यातील एकूण २६ गावातील ६०.९६९ किमी व इगतपुरी तालुक्यातील पाच गावातील ७.०६७ किमी, असा हा टप्पा आहे. पॅकेज – ११ अंतर्गत कोकमठाण (ता. कोपरगाव, जि. अहमदनगर), पॅकेज - १२ अंतर्गत गोंदे (ता. सिन्नर, जि. नाशिक) व पॅकेज- १३ अंतर्गत एसएमबीटी वैद्यकीय महाविद्यालय (भरवीर, ता. इगतपूरी, जि. नाशिक) या आंतरबदलाचा समावेश आहे.

### 600 किमीहून अधिक 'समृद्धी'मार्गस्थ

» एकूण ७०१ किमीपैकी ५२० किमीचा मार्ग डिसेंबरमध्ये सुरू झाल्यानंतर आता शुक्रवारी ८२ किमीचा मार्ग सुरू होत आहे. हा ८२ किमी लांबीचा मार्ग समृद्धी महामार्गाच्या पॅकेज क्रमांक ११, १२ आणि १३ चा भाग आहे. प्रकल्पाच्या या दुसऱ्या टप्प्याचा खर्च ३२०० कोटी रुपये आहे. या टप्याच्या उद्घाटनानंतर समृद्धी महामार्ग एकूण ६०२ किलोमीटरसाठी खुला होईल.

### ... असा आहे मार्ग

- » या मार्गावर एकूण सात मोठे पूल, १८ छोटे पूल, वाहनांसाठी ३० भुयारी मार्ग, हलक्या वाहनांसाठी २३ भुयारी मार्ग आहेत.
- » याच अवघ्या ८२ किमी मार्गावर तब्बल तीन पथकर प्लाझा अर्थात टोल नाके आहेत.
- » या पथकर प्लाझावर तीन आंतर बदल आहेत.
- » पथकर गोळा करण्यासाठी एकूण ५६ टोल केंद्र आहेत.
- » याखेरीज सहा वे ब्रीज (अवजड वाहनासाठीचे रॅम्प) या सुविधांचा समावेश

---

## कर्नाटकात आज मंत्रिमंडळाचा विस्तार; सिद्धरामय्या, शिवकुमार यांची सोनिया, राहुल गांधींशी चर्चा

।बंगळूरु। महाईन्यूज । प्रतिनिधी।

कर्नाटकचे मंत्री के. एच. मुनियप्पा यांनी शुक्रवारी दिल्लीहून बंगळुरूत परतल्यावर पत्रकारांना सांगितले, की राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार शनिवारी दुपारी होईल आणि संध्याकाळपर्यंत खात्यांचे वाटप केले जाईल. चार किंवा पाच मंत्रिपदे वगळता उर्वरित पदांसाठी शनिवारीच निवड होईल. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांची शुक्रवारी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी स्वतंत्र भेट घेतली. राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारासंदर्भात पक्षश्रेष्ठींशी विचारविनिमय करण्यासाठी ते दिल्लीत आले आहेत. त्यांनी कर्नाटकचे प्रभारी रणदीप सुरजेवाला, काँग्रेसचे संघटनात्मक सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचीही भेट घेऊन विचारविनिमय केला. कर्नाटक मंत्रिमंडळात आणखी २० मंत्र्यांचा समावेश करण्याचा विचार सुरू आहे. त्यावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याआधी चर्चेची आणखी एक फेरी होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. २० मे रोजी सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती.

### 24 जागांसाठी अनेक इच्छूक

कर्नाटक मंत्रिमंडळात ३४ मंत्री समाविष्ट करता येऊ शकतात. सिद्धरामय्या, शिवकुमार यांच्यासह आठ मंत्र्यांचा आधी शपथविधी झाल्याने आता मंत्रिमंडळातील २४ जागा रिक्त आहेत. मात्र, इच्छुकांची संख्या अधिक असल्याने या निवडीचे आव्हान श्रेष्ठींसह मुख्यमंत्र्यांसमोर उभे राहिले आहे. सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणारे, ज्येष्ठत्वाचा निकष आणि ज्यांच्याबाबत कुणाचाही आक्षेप नाही, स्वीकारार्हता असलेल्या आमदारांच्या नावांचा मंत्रिपदासाठी विचार होत आहे.

## लोकसभा निवडणुकीसाठी हुकमी एक्क्यांचे मन वळवणार!

### आमदारांना उतरवणार खासदारकीच्या लढाईत

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुका या भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांसाठी जशा महत्वाच्या आहेत, तशाच त्या भाजप विरोधकांसाठीही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत या निवडणुका जिंकण्यासाठी दोन्ही बाजूंनी निकराचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्यात सत्ताधारी तसेच विरोधक अशा दोघांकडूनही विधानसभेवर सातत्याने निवडून येणाऱ्या आमदारांना हुकमी एक्के म्हणून खासदारकीच्या अर्थात लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याची तयारी सुरू असल्याचे खात्रीलायकरित्या समजते..**

भाजपच्या विरोधात देशभरातील विरोधी पक्ष एकत्रित येत असून येणाऱ्या २०२४च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत भाजपला शह देण्याची खूणगाठ विरोधकांनी बांधली आहे. महाराष्ट्रातही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्या महाविकास आघाडीने भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या विरोधात रणशिंग फुंकले आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये विजय मिळवल्यास विधानसभा निवडणुकीतील विजयाचा मार्ग आपोआप सुकर होईल, असे सत्ताधाऱ्यांना आणि विरोधकांनाही वाटत आहे. त्यामुळे त्यांनी लोकसभा निवडणुकीची रणनीती आखायला सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये आपला उमेदवार निवडून आणावयाचा असल्यास उमेदवार देखील तेवढाच तगडा असायला हवा, यासाठी सर्वच पक्ष जिथे निवडणूक अटीतटीची होईल अशा ठिकाणी विधानसभेवर सातत्याने निवडून येणारे हुकमी एक्के असलेल्या आमदारांना उमेदवारी देण्याची तयारी करीत आहेत.



### शिंदे यांच्या शिवसेनातील हालचाली

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे सध्या १३ खासदार आहेत. यातील काही जागांना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून धोका असल्याचे स्पष्ट दिसत असल्याने या ठिकाणी त्यांच्या पक्षातील ४० आमदारांपैकी काही जणांना लोकसभा निवडणुकीत उतरविण्याबाबत चर्चा झाली आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह काही जणांची त्यासाठी चाचपणी सुरू आहे.

# "तू सत्य मानणार नाहीस आणि..." रुचिरा जाधव



बिग बॉस मराठीचे चौथे पर्व हे सुपरहिट ठरताना दिसत आहे. यंदाच्या पर्वाची सातत्याने चर्चा पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वामध्ये रुचिरा जाधव आणि डॉ. रोहित शिंदे ही जोडी एकत्र सहभागी झाली होती. सुरुवातीला गोडीगुलाबीने वावरणाऱ्या या जोडीमध्ये हळूहळू मतभेद व्हायला लागले. या वादानंतर सुरुवातीला रुचिरा जाधव ही घराबाहेर पडली. त्यानंतर काही आठवड्यांनी रोहित शिंदे बाहेर पडला. सध्या त्या दोघांच्याही रिलेशनशिपमध्ये फूट पडली आहे. त्यात रुचिराने शेअर केलेल्या एक पोस्टने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

बिग बॉस मराठीच्या घरात आल्यानंतर रोहित आणि रुचिरा एकमेकांबरोबर छान मिळून मिसळून राहत होते. पण काही दिवसांनी टास्क खेळताना, घरात वावरताना त्यांच्या मतभेद झाले. त्यांचा हा वाद वाढतच गेला. रुचिरा नॉमिनेट झाल्याने त्यांच्यातील वाद आणखी चिघळला.या कार्यक्रमामधून बाहेर पडल्यानंतर तिने रोहितला इन्स्टाग्रामवरुन अनफॉलो केले. यानंतर तिने काहीही केलं तर मी त्याला फॉलो करणार नाही, असेही जाहिरपण सांगितले. यामुळे त्यांच्या रिलेशनशिपमध्ये फूट पडल्याची बोललं जात आहे. त्यातच आता रुचिराने रोहितच्या आणि तिच्या नात्यात सर्व काही बिनसल्याचे संकेत दिले आहेत.

रुचिराने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने तिच्या हस्ताक्षरातील काही ओळी लिहिल्या आहेत. या ओळी हिंदीत असून तिने रात्री पावणेदोनच्या सुमारास त्या लिहिल्या आहेत. "सत्य तुला माहित आहे, तेच सत्य मला माहिती आहे. पण सत्य तर हे आहे की सत्य फक्त मला ठाऊक आहे. पण तू सत्य मानणार नाहीस आणि मी ते सोडणार नाही", असे तिने यात म्हटले आहे. या बरोबरच तिने तिची सही, आजची तारीख आणि वेळ असेही लिहिले आहे.

# जान्हवी कपूर पुन्हा दिसली एक्स बॉयफ्रेंडसह



बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या शिखर पहाडियाबरोबरच्या नात्यामुळे चर्चेत आहे. जान्हवी कपूरने पुन्हा एकदा एक्स बॉयफ्रेंड शिखरला डेट करण्यास सुरुवात केल्याचे सांगितले जात आहे. शनिवारी शिखर आणि जान्हवी दिल्लीत एका कार्यक्रमादरम्यान एकत्र दिसले. या पार्टीतील एक व्हिडिओही समोर आला आहे, जो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये जान्हवी कपूर स्ट्रॅपलेस ड्रेसमध्ये दिसत आहे आणि त्याला मॅचिंग कलरचा ओव्हरकोट घातला आहे आणि केस मोकळे सोडले आहेत. तर शिखर चमकदार जॅकेटमध्ये झळकत आहे. व्हिडिओमध्ये दोघेही एका व्यक्तीशी बोलताना दिसत आहेत. हा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू असल्याची माहिती समोर आली आहे. रिपोर्टनुसार, त्याने जान्हवी कपूर कपूरला डेट केले आहे. मात्र, काही काळानंतर दोघे वेगळे झाले. करण जोहरने त्याच्या 'कॉफी विथ करण ७' या शोमध्ये दोघांमधील नात्याची पुष्टी केली होती. याआधीही जान्हवी कपूर आणि शिखर मुंबईत बऱ्याचदा एकत्र दिसले आहेत.

संजय पहाडिया आणि स्मृति शिंदे यांच्यापोटी जन्मलेला शिखर हा उद्योगपती आहेच शिवाय तो एक उत्तम पोलो प्लेयर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याने भारताचं नेतृत्वदेखील केलं आहे. रीजेंट युनिव्हर्सिटी ऑफ लंडनमधून ग्लोबल फायनान्शियल मॅनेजमेंटमध्ये त्याने शिक्षण घेतलं आहे.

# अनिल कपूर जॅकी श्रॉफच्या पाया पडतो

हिंदी सिनेमाविश्वामध्ये जॅकी श्रॉफ आणि अनिल कपूर ही जोडी कमालीची लोकप्रिय आहे. दोघांनी अनेक सिनेमांत एकत्र काम केलं आहे. दोघांमध्ये खूप छान बॉंडिंग देखील आहे. ऑनस्क्रीन जशी त्यांची उत्तम केमेस्ट्री आहे तशीच ऑफस्क्रीन देखील आहे. खऱ्या आयुष्यात ते एकमेकांचे खूप चांगले मित्र आहेत. सिनेमांत जॅकी श्रॉफ यांनी अनिल कपूर यांच्या मोठ्या भावाच्या भूमिका साकारल्या आहेत. परंतु खऱ्या आयुष्यात जॅकी अनिल यांच्यापेक्षा लहान आहेत. अलिकडेच जॅकी श्रॉफ यांनी एका मुलाखतीमध्ये अनिल कपूर यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या आहेत.

अलिकडेच जॅकी यांनी एका मुलाखतीमध्ये अनिल यांच्या मोठ्या भावाची भूमिका साकारण्याबद्दल त्यांचं मत व्यक्त केलं. ते म्हणाले की, 'कदाचीत मी दिसायला मोठा आहे आणि तो लहान दिसतो. त्यामुळेच मी अनेकदा त्याच्या मोठ्या भावाची भूमिका साकारल्या आहेत.' त्यानंतर हसत हसत जॅकी यांनी सांगितलं की, 'त्यामुळेच जेव्हा जेव्हा आम्ही सार्वजनिक ठिकाणी एकमेकांना भेटतो तेव्हा अनिल मला वाकून नमस्कार करतो. जेणे करून लोकांना वाटेल मी त्याच्यापेक्षा मोठा आहे.'

अनिल कपूरबद्दल जॅकी यांनी सांगितलं की, 'आम्ही दोघे एकसारखे आहोत. त्यासाठी आम्हाला रोज भेटण्याची गरज नाही,रोज एकत्र फिरण्याचीही गरज नाही. आम्ही जेव्हा पहिल्यांदा भेटलो होते तेव्हा अनिल त्याची प्रेयसी म्हणजे आताची त्याच्या बायकोला घेऊन नेपेन सी रोडला आला होता. त्यानं मला सांगितलं की, जग्गूदादा मला तुझ्यासारखं व्हायचं आहे. आम्ही तिघांनी एकत्र गप्पा मारल्या. आम्ही दोघं जेव्हा जेव्हा भेटायचो तेव्हा धम्माल मस्ती करायचो. आम्ही दोघं भाऊ म्हणजे आग आहोत..'



# "अपूर्वा नाटकी असल्याचं दाखवत असली तरी..." अमृता देशमुख



बिग बॉस मराठीच्या गेल्या आठवड्यात दोन सदस्य घराबाहेर जाणार असल्यामुळे मोठा ट्विस्ट आला होता. त्यात विकास सावंत शनिवारी (१७ नोव्हेंबर) बिग बॉसच्या घरातून बाहेर पडला. त्यानंतर आता पुण्याची टॉकरवडी अमृता देशमुख हिचाही प्रवास संपुष्टात आला आहे. यानंतर नुकतंच राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीत अमृता देशमुखने अपूर्वा नेमळेकर ही नाटकी असल्याचे म्हटलं आहे.

अमृता देशमुखने नुकतंच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला बिग बॉसच्या घरात सर्वात जास्त नाटकी कोण आहे असं तुला वाटतं? असा प्रश्न विचारला होता. त्यावर तिने एकाही क्षणाचा विलंब न करता अपूर्वा असे नाव घेतले.दरम्यान 'बिग बॉस'च्या घरातील प्रवास संपल्याने अमृताला खेळातून बाहेर पडावे लागेल. सुरुवातीच्या दिवसांत अमृताचा घरातील वावर फार कमी होता. पण नंतर तिने स्वत:ला सिद्ध करत खेळ खेळायला सुरुवात केली होती. टास्कदरम्यानही तिची आक्रमकता दिसून आली होती. पहिल्या आठवड्यापासून प्रत्येक नॉमिनेशन टास्कमध्ये अमृताला घरातील सदस्यांनी नॉमिनेट केलेलं पाहायला मिळालं.

# वृशिका मेहता लवकरच होणार विवाहबद्ध



'सध्या सर्वत्र लग्नाचा माहोल आहे. अनेकजण विवाहबंधनात अडकत आहेत. सेलिब्रिटीही याला अपवाद नाहीत. गेल्या एका महिन्यात हिंदी आणि मराठी मनोरंजन सृष्टीतील अनेक कलाकार विवाह बंधनात अडकले आहेत, तर येत्या काळात काही लग्न करणार आहेत. आता या यादीत एका लोकप्रिय हिंदी अभिनेत्रीचा समावेश झाला आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है' फेम अभिनेत्री वृशिका मेहता हिने नुकतीच सोशल मीडियावरून तिच्या चाहत्यांना एक गुड न्यूज दिली. तिने नुकताच साखरपुडा केल्याचं सोशल मीडिया वरून जाहीर केलं. सौरभ घेडिया तिच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव आहे.

# मुंबई इंडियन्सचा खेळ खल्लास!

## गुजरात आणि चेन्नईमध्ये होणार IPL 2023 FINAL

**। अहमदाबाद।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**गुजरातच्या संघापुढे अखेर मुंबईच्या संघाने शरणागती पत्करल्याचे पाहायला मिळाले. शुभमन गिलच्या शतकाच्या जोरावर गुजरातने २३३ धावांचा डोंगर उभारला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने चांगली लढत दिली. सूर्यकुमार यादवने अर्धशतकही झळकावले. पण मोक्याच्या क्षणी तो बाद झाला आणि तिथेच हा सामना मुंबईच्या हातून निसटला. त्यामुळे आता गुजरात टायटन्स अंतिम फेरीत दाखल झाली आहे आणि त्यांचा सामना चेन्नई सुपर किंग्स यांच्यात आता २८ जूनला अंतिम फेरीचा सामना रंगणार आहे. मुंबईचा गुजरातने यावेळी ६२ धावांनी विजय मिळवला.**





मुंबईच्या डावाची सुरुवात चांगली झाली नाही. मुंबईच्या संघाने इम्पॅक्ट खेळाडू म्हणून यावेळी नेहाल वधेराला संधी दिली होती. कारण गेल्या सामन्यात नेहालने तुफानी फटकेबाजी केली होती. दुसरीकडे इशान किशनही दुखापतग्रस्त झाला होता आणि तो सलामीला येऊ शकणार नव्हता. त्याचबरोबर नेहालही डावखुरा असल्यामुळे त्याला सलामीला आणण्याची खेळी मुंबई इंडियन्सने केली खरी, पण हा प्रयोग त्यांचा यशस्वी ठरला नाही. कारण नेहाल यावेळी फक्त चार धावांवर आऊट झाला. त्यामुळे मुंबईचा हा प्रयोग फसला. त्यानंतर रोहितच्या खांद्यावर संघाची जबाबदारी होती. पण रोहित पुन्हा एकदा अपयशी ठरल्याचे पाहायला मिळाले. कारण रोहित यावेळी फक्त आठ धावांवर बाद झाला. त्यामुळे मुंबईला सुरुवातीला हे दोन धक्के बसले होते. मुंबईला हे दोन्ही धक्के दिले होते ते मोहम्मद शमीने. पण रोहित बाद झाला तरी मुंबईचा संघ हतबल झाला नाही. मुंबईला त्यानंतर अजून एक धक्का बसला. कारण कॅमेरून ग्रीनला यावेळी दुखापत झाली. त्याच्या हातावर चेंडू बसला. ही दुखापत गंभीर असल्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. पण त्यानंतर फलंदाजीला आलेल्या तिलक वर्मने कमाल केली. तिलकने यावेळी तुफानी फटकेबाजी कर गुजरातच्या गोलंदाजांची चांगलीच शाळा घेतली. पण त्याची ही आक्रमकता जास्त काळ टिकू शकली नाही.

### गिलच्या बॅटमधून धावा नाही तर रेकॉर्ड निघाले

**आयपीएल २०२३ च्या दुसऱ्या क्वॉलिफायरमध्ये शुभमन गिलने मुंबई इंडियन्स विरुद्ध धमाकेदार शतक झळकावले. गिलचे हे या हंगामातील तिसरे शतक आहे. त्याने फक्त ४९ चेंडूत शतक पूर्ण केले. गिलने ६० चेंडूत १२९ धावा केल्या. यात ७ चौकार आणि १० षटकारांचा समावेश होता. गिलच्या या खेळीने आयपीएलच्या रेकॉर्ड बुकमधील अनेक विक्रम मोडले गेले. आयपीएल २०२३ मध्ये गिलने फक्त ४९ चेंडूत शतक पूर्ण केले. हे शतक त्याने दुसऱ्या क्वॉलिफायर लढतीत पूर्ण केले. त्याच बरोबर त्याच्या नावावर अनेक विक्रम देखील झाले. या खेळीनंतर मुंबईचा कर्णधार रोहित शर्माने देखील त्याचे कौतुक केले.- मुंबई इंडियन्स विरुद्धच्या शतकी खेळीबरोबरच शुभमनने या हंगामात ८०० धावांचा टप्पा पार केला. अशी कामगिरी करणारा तो फक्त चौथा फलंदाज आहे. याआधी विराट कोहीलने ९७३, जोस बटलरने ८६३ तर डेव्हिड वॉर्नरने ८३८ धावा केल्या आहेत.**
**- शुभमन गिलने शतक झळकावत प्लेऑफमध्ये शतकी खेळी करणारा सर्वात युवा फलंदाज होण्याचा मान मिळवला. त्याने २३ वर्ष आणि २६०व्या दिवशी ही कामगिरी केली.**
**गिलने फक्त ३२ चेंडूत अर्धशतक तर ४९ चेंडूत शतक केले. प्लेऑफमध्ये सर्वात वेगाने शतक करण्याबाबत तयाने ऋद्धिमान साहा आणि रजत पाटीदार यांच्या विक्रमाशी बरोबरी केली.**

## आयपीएल समारोप समारंभात कलाकारांची मांदियाळी!

### चाहत्यांना मिळणार रंगारंग कार्यक्रमांची खास मेजवानी

**। अहमदाबाद ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**आयपीएल 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरातला चेन्नई सुपर किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, साखळी फेरीअंती गुणतालिकेत अग्रस्थानी राहिल्यामुळे गुजरातला अंतिम फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.**



शुक्रवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात क्वालिफायर-२ सामना होणार आहे. विजयी संघ २८ मे रोजी अहमदाबाद येथे होणाऱ्या अंतिम फेरीत चेन्नई सुपर किंग्जशी भिडणार आहे. चेन्नईचा संघ आधीच फायनलमध्ये पोहोचला आहे. अंतिम सामन्यापूर्वी समारोप समारंभ होईल, ज्यांच्या कामगिरीची यादी आयपीएलने अधिकृत वेबसाइटवर जाहीर केली आहे.

आयपीएल २०२३च्या समारोप समारंभात रॅपर किंग आणि संगीत दिग्दर्शक आणि गायक न्यूक्लेया (NUCLEYA) सादर करताना दिसतील. त्याच वेळी, रॅपर डिवाइन आणि गायिका जोनिता गांधी देखील रंगारंग कार्यक्रमात आपली कला सादर करणार आहेत. याआधी, गायक अरिजित सिंग आणि एपी. ढिल्लोन उद्घाटन समारंभात परफॉर्म करताना दिसले होते. त्याचबरोबर अभिनेत्री तमन्ना आणि रश्मिका मंदान्ना यांनीही आपल्या नृत्याने रसिकांची मने जिंकतील. चला जाणून घेऊया समारोप समारंभात कोणकोणते कलाकार आहेत...

किंगला किंग रोको असेही म्हणतात. MTV हसल २०१९च्या पहिल्या पाच अंतिम स्पर्धकांमध्ये तो होता. तर, न्यूक्लिया संगीत निर्माता आहे. जोनिता गांधी यांनी बॉलिवूडमध्ये काही सुपरहिट गाणी गायली आहेत. यामध्ये 'ब्रेकअप साँग', 'करंट लगा रे' अशा काही गाण्यांचा समावेश आहे. दिव्य देखील एक रॅपर/गायक आहे. रणवीर सिंगचा 'गली बॉय' हा चित्रपट डिव्हाईनच्या आयुष्यावर आधारित आहे. आयपीएलच्या मिड शोमध्ये दिव्य आणि जोनिताही परफॉर्म करताना दिसणार आहेत.

## अंपायर डॅरिल हार्परची एम.एस. धोनीला सणसणीत चपराक





**। चेन्नई ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

चार वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्स (CSK) कर्णधार महेंद्रसिंग धोनी हा क्रिकेट इतिहासातील सर्वात यशस्वी आणि हुशार कर्णधारांमध्ये गणला जातो. मंगळवारी आयपीएल २०२३मध्ये गुजरात टायटन्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान कर्णधार धोनीने क्रिकेट जगताला दोन भाग पाडून टाकले. एकीकडे चाहते त्याच्या कर्णधाराचे कौतुक करत आहेत, तर दुसरीकडे अनेक माजी क्रिकेटपटू धोनीच्या या कृतीवर टीका करत आहेत. धोनीच्या टीकाकारांमध्ये माजी अंपायर्सनीही उडी घेतली आहे. चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार एम.एस. धोनी २३ मे रोजी चेन्नईच्या चेपॉक मैदानावर गुजरात टायटन्स विरुद्ध आयपीएल २०२३चा पहिला क्वालिफायर सामना खेळला होता, परंतु या सामन्यादरम्यान खेळाच्या भावनेचा आदर न केल्यामुळे आयसीसीचे माजी अंपायर डॅरिल धोनी यांच्यावर टीका करण्यात आली.

हार्परने त्याच्यावर टीका केली.गुजरातविरुद्धच्या पहिल्या क्वालिफायर सामन्याच्या दुसऱ्या डावातील १६व्या षटकात एम.एस. धोनीचा अंपायरशी वाद झाला. खरं तर, चेन्नईचा वेगवान गोलंदाज मथिशा पाथिराना काही मिनिटांसाठी मैदानाबाहेर होता आणि त्यामुळे लगेचच मैदानात परतल्यानंतर त्याला अंपायरने गोलंदाजी करण्याची परवानगी दिली नाही.